पेजिनेशनसाठी
अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १७४। किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) रविवार १९/०७/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

# केंद्र सरकारकडून सीजेपीचे आंदोलन मोडण्याचा प्रयत्न

## सोनम वांगचूक यांना जबरजस्तीने रूग्णालयात हलवले




नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

नीटसह विविध स्पर्धा परीक्षांतील कथित गैरव्यवहार, पेपरफुटी, विद्यार्थ्यांच्या आत्महत्या आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला शनिवारी नवे वळण मिळाले. ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ सोनम वांगचूक यांच्या उपोषणाचा आज विसावा दिवस असताना, पहाटे दिल्ली पोलिसांनी त्यांना प्रकृतीचे कारण पुढे करत रुग्णालयात हलविले. या कारवाईनंतर आंदोलनकर्त्यांनी केंद्र सरकारवर आंदोलन दडपण्याचा आरोप करत तीव्र संताप व्यक्त केला.

कॉक्रोच जनता पार्टी (सीजेपी)च्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या आंदोलनात वांगचूक यांनी गेल्या वीस दिवसांपासून आमरण उपोषण केले होते. मात्र या काळात केंद्र सरकारकडून कोणताही संवाद साधला गेला नाही किंवा मागण्यांची दखल घेण्यात आली नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. उपोषणामुळे वांगचूक यांची प्रकृती खालावत असतानाच, सोमवार (२० जुलै) रोजी संसदेला घेराव घालण्याचे आवाहन सीजेपीने केले होते. या आवाहनाला देशभरातून मोठा प्रतिसाद मिळत असून दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलकांची गर्दीही वाढत होती.

याच पार्श्वभूमीवर शनिवारी पहाटे पोलिसांनी मोठ्या बंदोबस्तात वांगचूक यांना ताब्यात घेऊन रुग्णालयात दाखल केले. दिल्ली पोलिसांनी ही कारवाई दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आणि त्यांच्या प्रकृतीच्या कारणास्तव करण्यात आल्याचे स्पष्ट केले आहे.

## अभिजीत दिपकेचे आमरण उपोषण सुरू



दुसरीकडे, सीजेपीचे राष्ट्रीय अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी या कारवाईचा तीव्र निषेध करत, सोनम वांगचूक यांना जबरदस्तीने उचलून नेणे ही लोकशाहीवरील दडपशाही असून केंद्र सरकारची हुकूमशाही वृत्ती आहे, असा आरोप केला. तसेच, वांगचूक यांच्या जागी आपण स्वतः आमरण उपोषणास सुरुवात करत असल्याची घोषणा त्यांनी केली.

दिपके यांनी स्पष्ट इशारा देताना सांगितले की, सोमवारी संसदेवर घेराव मोर्चा होणारच. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा मिळेपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही.

दरम्यान, दिल्ली पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तात आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप करत आंदोलकांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. पोलिस कारवाईनंतरही आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला असून, सोमवारी होणाऱ्या संसदेवरील घेरावाकडे देशाचे लक्ष लागले आहे.


## प्रसिद्ध गोल्डन बेकरीवर एफडीएची मोठी कारवाई

पुणे (वृत्तसंस्था)

पुण्यातील विविध हॉटेल्स आणि बेकरींवर अन्न व औषध प्रशासनाने पुन्हा एकदा कारवाईचा बडगा उगारला आहे. शहरातील नामांकित 'गोल्डन बेकरी'सह पुणे, सातारा, सांगली आणि कोल्हापूरमधील एकूण १० बेकरी आणि हॉटेल्सचे परवाने तातडीने निलंबित करण्यात आले आहेत. गुरुवार आणि शुक्रवारी करण्यात आलेल्या विशेष तपासणी मोहिमेदरम्यान ही कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे अन्न पदार्थांमध्ये भेसळ करणारे आणि अस्वच्छता ठेवणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

एफडीएच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या सर्व बेकरी, डेअरी आणि हॉटेल्समध्ये अन्न सुरक्षा मानके कायद्याचेसर्रास उल्लंघन होत असल्याचं उघडकीस आलं आहे. तपासणी दरम्यान या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अस्वच्छता आणि गलिच्छ वातावरण आढळून आलं. एफडीएने या कारवाईदरम्यानचे काही फोटोही प्रसिद्ध केले असून, यामध्ये नागरिकांचे आवडते खाद्यपदार्थ किती घाणेरड्या आणि अस्वच्छ जागेत तयार केले जात होते, याचे धक्कादायक चित्र समोर आलं आहे.पुण्याच्या कोंढवा येथील गोल्डन बेकरी, येवलेवाडीतील गोल्डन मॅजेस्टिक बेकरी, मंगळवार पेठेतील स्टार केटरिंग सर्व्हिस, सोमवार पेठेतील अशोक बार अँड रेस्टॉरंट आणि बाणेर परिसरातील बिकांगे बिर्यानी एलएलपीवर एफडीएने तातडीची कारवाई करत सर्वच आस्थापनांचे परवाने निलंबित केले आहेत. ही परवाने निलंबनाची कारवाई केवळ पुणे शहरातच नव्हे, तर पुणे जिल्ह्यासह सातारा, सांगली आणि कोल्हापूरमधील काही आस्थापनांवरही करण्यात आली आहे.

## बियाणे, खते व कीटकनाशक तक्रारींचे सात दिवसांत निराकरण- कृषीमंत्री



मुंबई (वृत्तसंस्था)

शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, खते व कीटकनाशके उपलब्ध करून देण्यास राज्य शासनाचे सर्वोच्च प्राधान्य असून याबाबत आलेल्या तक्रारींचे जलद व पारदर्शक पद्धतीने निराकरण करण्यासही प्राथमिकता आहे. यासाठी तालुकास्तरीय तक्रार निवारण समित्यांची फेररचना करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर पुढील सात दिवसांच्या आत प्रत्यक्ष शेतावर जाऊन तपासणी करून अहवाल अंतिम करण्यात येणार आहे, असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

कृषी मंत्री श्री. भरणे म्हणाले, खरीप हंगामात बियाण्यांच्या उगवण क्षमतेसह खते आणि कीटकनाशकांच्या गुणवत्तेबाबत तक्रारी प्राप्त होत आहेत. अशा तक्रारींचे तातडीने आणि प्रभावीपणे निराकरण व्हावे, यासाठी शासनाने तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीची सुधारित रचना लागू केली आहे.

तालुका कृषी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीत कृषी विद्यापीठ, कृषी संशोधन केंद्र किंवा कृषी विज्ञान केंद्र, महाबीज यांचा प्रतिनिधी, संबंधित कृषी अधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि वस्तुनिष्ठ तपासणी होऊन शेतकऱ्यांना न्याय मिळण्यास मदत होईल, असेही कृषी मंत्री यांनी सांगितले.

# चमच्यांविरोधात निष्ठावंतांचा एल्गार

## साहेबांशी थेट संवादासाठी कारखाना गेस्ट हाऊसवर मेळावा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -पक्षासाठी वर्षानुवर्षे निस्वार्थपणे काम करणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या भावना, अडचणी आणि वास्तव परिस्थिती थेट माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने 'निष्ठावंत कार्यकर्त्यांचा निर्धार मेळावा - साहेबांशी थेट संवाद' या उपक्रमाचे आयोजन रविवार, १९ जुलै रोजी दुपारी ४ वाजता कारखाना गेस्ट हाऊस येथे करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून पक्षातील तथाकथित 'चमचा संस्कृती'विरोधात एकनिष्ठ कार्यकर्त्यांनी एल्गार पुकारला असून, सामान्य कार्यकर्त्यांचा आवाज थेट नेतृत्वापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

याबाबत प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवेदनात पक्षात स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी चुकीची माहिती देणारे, राजकीय खेळी करणारे आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांना नेतृत्वापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. निष्ठा, सत्य आणि साहेबांवरील विश्वास हाच आमचा आधार असल्याचे सांगत, कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन आपल्या वेदना आणि भूमिका साहेबांसमोर मांडण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, गावपातळीपासून पक्षाच्या प्रत्येक लढाईत सामान्य कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे कष्ट घेतले, विरोधकांशी संघर्ष केला आणि नेतृत्वासाठी झटले. मात्र, सत्तेच्या केंद्रस्थानी काही मोजक्या व्यक्तींचा प्रभाव वाढल्याने निष्ठावंत कार्यकर्ते निर्णय प्रक्रियेपासून दूर गेले. अनेक कार्यकर्त्यांना सातत्याने डावलले गेले असून, त्यांचा वापर केवळ निवडणुकीपुरताच करण्यात आल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे.

येत्या ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये घराघरातील सामान्य तरुणांना व निष्ठावंत कार्यकर्त्यांना उमेदवारी देण्याची मागणीही या संवादातून मांडण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. आम्ही एकच साहेब मानतो, ते म्हणजे नामदार बाळासाहेब थोरात. आमचा राग नेतृत्वावर नाही, मात्र नेतृत्वाभोवती निर्माण झालेल्या चमचा संस्कृतीवर आहे, अशी भूमिका निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. कार्यकर्त्यांना कोणत्याही दबावाला किंवा (पान ४ वर)










Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services



लोकशाही अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतीदिनानिमित्त दैनिक युवावार्ता कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी संपादक किसन भाऊ हासे यांनी अण्णा भाऊ साठे यांचे सामाजिक, सांस्कृतिक योगदान विषद केले. यावेळी स्वराज्य सैनिक कल्याण संस्थेचे प्रकाश कोटकर व त्यांचे सहकारी उपस्थित होते.



युवा उद्योग समूहाचे संचालक आनंद किसन हासे यांची रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या असिस्टंट गव्हर्नरपदी निवड झाल्याबद्दल दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने त्यांचा कार्यालयात सत्कार करून सन्मान करण्यात आला. याप्रसंगी दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे व दैनिक युवावार्ता परिवारातील सर्व सहकारी उपस्थित होते.

# अमृतवाहिनी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांची इस्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड

युवावार्ता ( प्रतिनिधी )

संगमनेर- महाराष्ट्राचे माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली व सौ.शरयूताई देशमुख यांच्या संकल्पनेतून अमृतवाहिनी इंटरनॅशनल स्कूल मधील विद्यार्थ्यांनी सी व्ही रमन परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी केल्याने दोन विद्यार्थ्यांची इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे तर जवाहर नवोदय व जिल्हास्तरीय शिष्यवृत्ती परीक्षेतही स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मोठे यश मिळवले असल्याची माहिती प्राचार्य सौ.जे.बी.सेटी यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना प्राचार्य सौ.सेटटी यांनी सांगितले की, अमृतवाहिनी इंटरनॅशनल स्कूल मधील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी जिज्ञासा वाढवण्यासाठी सातत्याने विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. राज्य पातळीवरील विज्ञान विषयक असलेल्या सी व्ही रमन परीक्षेमध्ये विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यापैकी पाचवी मधील विद्यार्थिनी



अनन्या विशाल मोरे यांनी या परीक्षेमध्ये ८० टक्के गुण मिळवले तर सातवी मधील शिकत असलेल्या विराज जयराज हिरे यांनी ७२% टक्के गुण मिळून तालुक्यात तिसरा क्रमांक प्राप्त केला. जवाहर नवोदय निवड चाचणी मध्ये श्रावणी किशोर खेमनर हिची निवड झाली आहे. जिल्हास्तरीय शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये सर्वज्ञा सुभाष यादव हिने ७६.५१ टक्के गुण मिळत जिल्ह्यात २१ वा तर अन्वी सिताराम कवडे ७३.१५ टक्के गुण प्राप्त करून जिल्ह्यात २५ वा क्रमांक पटकावला आहे.

या दोघांचीही इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. या अंतर्गत त्यांना इस्त्रो मधील विविध संशोधन केंद्रांची माहिती मिळणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन संशोधन वृत्ती आणि नवनिर्मिती विकसित करण्यासाठी या उपक्रमाचा नक्कीच लाभ होणार आहे. तर जिल्हास्तरीय शिष्यवृत्ती परीक्षेतून या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार आहे आणि जवाहर नवोदय विद्यालयाच्या परीक्षेतही विद्यार्थ्यांचे मोठे यश ठरणार आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी शिक्षण व महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ.सुधीर तांबे, संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त सौ.शरयूताई देशमुख, डॉ.जयश्रीताई थोरात, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे व्यवस्थापक प्रा.व्ही.बी.धुमाळ, प्राचार्य सौ.जे.बी.शेठी यांच्यासह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# लेकीच्या अश्रूंनी बदलले बापाचे आयुष्य !

## अवैध दारू विक्रीला कायमचा रामराम; स्वाभिमानाने सुरू केली मासे विक्री

युवावार्ता (प्रतिनिधी) -

लिंगदेव - बाबा, दारू विकू नका शाळेत दारू विकणाऱ्याची मुलगी म्हणून होणारी हेटाळणी सहन न झाल्याने एका चिमुरडीने वडिलांसमोर केलेली ही भावनिक विनंती अखेर एका कुटुंबाच्या आयुष्यात परिवर्तन घडवून गेली. लेकीच्या डोळ्यातील अश्रूंनी हेलावलेल्या पित्याने अवैध दारू विक्रीचा व्यवसाय कायमचा बंद करून स्वाभिमानाने मासे विक्रीचा नवा व्यवसाय सुरू केला. अकोले तालुक्यातील लिंगदेव येथे घडलेली ही घटना सामाजिक परिवर्तनाचा प्रेरणादायी आदर्श ठरत आहे.



काही दिवसांपूर्वी लिंगदेव येथे गावातील अवैध दारू विक्री बंद करण्यासाठी ग्रामसभा आणि दारूबंदी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत महिलांनी दारूमुळे उध्वस्त होत असलेल्या कुटुंबांची वेदना मांडली. त्याचवेळी संबंधित दारू विक्रेत्याच्या मुलीला शाळेत दारू विकणाऱ्याची मुलगी म्हणून हिणवले जात असल्याची बाब समोर आली.

या अपमानाने व्यथित झालेल्या मुलीने घरी येत आपल्या वडिलांना, बाबा, दारू विकू नका, अशी कळकळीची विनंती केली. लेकीच्या निरागस शब्दांनी आणि अश्रूंनी पित्याचे मन पिळवटून गेले. त्यानंतर पिनू (शंकर) आढाव यांनी कोणताही विलंब न लावता अवैध दारू विक्री कायमची बंद करण्याचा निर्णय घेतला आणि प्रामाणिकपणे मासे विक्रीचा व्यवसाय सुरू केला. त्यांच्या या धाडसी निर्णयाचे गावभर कौतुक होत आहे.

नव्या व्यवसायाचे उद्घाटन आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या पत्नी सौ. पुष्पा लहामटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दारूबंदी चळवळीचे प्रणेते हेरंब कुलकर्णी यांनी पिनू आढाव, त्यांच्या पत्नी आणि मुलीचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

यावेळी बोलताना पुष्पा लहामटे म्हणाल्या एका चिमुकल्या मुलीने आपल्या वडिलांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणला. तिच्या धाडसामुळे एका कुटुंबाला नवी दिशा मिळाली असून हा निर्णय अनेकांसाठी प्रेरणादायी ठरेल. दारूबंदी चळवळीचे प्रणेते हेरंब कुलकर्णी यांनी तालुक्यातील सर्व अवैध दारू विक्रेत्यांना दारू विक्रीचा व्यवसाय सोडून प्रामाणिक उपजीविकेचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले. दारू विक्री सोडणाऱ्यांचा गावागावांत सार्वजनिक सत्कार करण्यात येईल अशी घोषणाही त्यांनी केली.

प्रा. मच्छिंद्र देशमुख यांनी समाजाने अवैध दारू विक्रीला कोणत्याही प्रकारचे सामाजिक पाठबळ देऊ नये असे आवाहन केले.

अकोले तालुका दारूबंदी चळवळीच्या अध्यक्षा विमल मुंढे यांनी महिलांना मार्गदर्शन करताना ठाम भूमिका मांडली. त्या म्हणाल्या आजपासून तालुक्यातील प्रत्येक महिला माझ्या कुटुंबातील सदस्य आहे. दारूमुळे कोणत्याही महिलेवर अन्याय किंवा अत्याचार होऊ देणार नाही. प्रत्येक महिलेला न्याय मिळावा यासाठी मी स्वतः प्रयत्नशील राहीन. दारूमुक्त, सुरक्षित आणि सन्मानाने जगणारा समाज घडविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे. ग्रामपंचायत सदस्या कल्पना फापाळे यांनी पिनू आढाव यांचे अभिनंदन करताना सांगितले, आपण घेतलेला निर्णय केवळ आपल्या कुटुंबासाठी नाही तर संपूर्ण लिंगदेव गावासाठी ऐतिहासिक आहे. आपल्या परिवर्तनातून इतरांनाही प्रेरणा मिळेल आणि लिंगदेव लवकरच दारूमुक्त गाव म्हणून ओळखले जाईल.

या कार्यक्रमाला दारूबंदी चळवळीचे प्रणेते हेरंब कुलकर्णी, प्रा. मच्छिंद्र देशमुख, लिंगेश्वर देवस्थानचे अध्यक्ष डी. बी. फापाळे, पुष्पा लहामटे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला तालुका अध्यक्षा नीता आवारी, सरपंच अमित घोमल, रविंद्र मालुंजकर, दशरथ उगले, जालिंदर बोडके, सदाशिव कानवडे, कैलास आरोटे, गोपीनाथ हाडवळे, कल्पना फापाळे, लता गावडे, नंदा कातोरे, विमल मुंढे यांच्यासह अनेक मान्यवर आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

एका चिमुकल्या लेकीच्या अश्रूंनी केवळ एका बापाचा व्यवसाय बदलला नाही, तर संपूर्ण गावाला सामाजिक परिवर्तनाचा नवा संदेश दिला. अवैध दारू विक्री सोडून स्वाभिमानाने प्रामाणिक व्यवसाय स्वीकारण्याचा हा निर्णय लिंगदेवच्या दारूमुक्त गावाच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा ठरत असून समाजासाठी प्रेरणादायी उदाहरण बनला आहे.

# संगमनेरच्या विकासकामांचा आ. खताळांनी घेतला आढावा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -महायुती सरकारच्या माध्यमातून आमदार झाल्यानंतर संगमनेर मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर करण्यात आला असून, मंजूर कामे निर्धारित वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावीत, यासाठी संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. विकासकामांच्या गुणवत्तेबाबत कोणत्याही प्रकारची तडजोड सहन केली जाणार नाही, अशा सूचना आमदार अमोल खताळ यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.



आमदार अमोल खताळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात शुक्रवारी (दि. १७) दुपारी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीला सार्वजनिक बांधकाम विभाग, अहिल्यानगरचे अधीक्षक अभियंता विवेक माळुंजे, संगमनेर उपविभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास वर्पे, सहाय्यक अभियंता संजय टेकाळे यांच्यासह उपअभियंते उपस्थित होते.

यावेळी आमदार खताळ म्हणाले की, निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारांवर कठोर कारवाई करण्याबाबत अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. शासनाचा निधी हा जनतेच्या हितासाठी असून, प्रत्येक विकासकाम निर्धारित निकषांनुसार आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण झाले पाहिजे. कामात हलगर्जीपणा किंवा निष्काळजीपणा करणाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही.

कोल्हार-घोटी राज्य मार्गावरील खड्ड्यांमुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. संबंधित ठेकेदाराला अनेक वेळा पत्रव्यवहार करूनही आवश्यक दुरुस्ती करण्यात आलेली नसल्याने याबाबत विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित करून सरकारचे लक्ष वेधले असल्याचेही त्यांनी सांगितले.

सध्या पावसाळ्यामुळे काही अडचणी असल्या तरी त्या तातडीने दूर करून रस्त्याचे डांबरीकरण व दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच ज्या ठेकेदारांच्या कामांचा दुरुस्ती कालावधी अद्याप शिल्लक असूनही ते रस्त्यांची दुरुस्ती करत नाहीत,अशा ठेकेदारांवरही नियमानुसार कारवाई करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

# बेदरकार, बेफाम, भन्नाट...

**हा लेख आजच्या करिअरच्या अंधस्पर्धेवर आणि तरुणांवरील वाढत्या अपेक्षांवर भाष्य करतो. डॉक्टर, इंजिनीअर किंवा स्पर्धा परीक्षांपुरतेच करिअर मर्यादित नसून, प्रत्येकाने आपल्या आवडीनुसार आणि क्षमतेनुसार स्वतःची वाट निवडावी, अपयशाचा स्वीकार करून आनंदी व अर्थपूर्ण जीवन जगावे, हा या लेखाचा मुख्य संदेश आहे.**




असं जगणं भाग्याचंच ! ... पण... पण असं जगणं भाग्यात असतं का? थोडी माणसं अशी भाग्यवान! बेदरकार म्हणजे बेदरकारपणे गाडी चालवून माणसं चिरडतात तसं बेपर्वा जगणं नाही बरं का! अगदी मस्तमौल, मनमौजी, कलंदर! स्वतंत्र, निर्भीड, मनासारखं, स्वतःच्या अटींवर, स्वतःच्या हिंमतीवर जगणं. भविष्याची चिंता न करता वर्तमानात जगणं! स्वतःच्या गच्चीत उभं राहून स्वतःच्याच धुंदीत स्वतःचा पतंग उडवणं. भूकंपासारखे धक्के खाऊनही न डगमगणं. कृष्णासारखं आपल्याच बासरीच्या सूरांत तल्लीन होणं . वादळाला न घाबरता किनाऱ्यावरचं स्वतःचं गलबत तुफानी दर्यात झोकून देणं . शेळीच्या शंभर वर्षांपेक्षा वाघाच्या दहाच वर्षांची निवड करणं ...बल्लूयासारखं! बल्लूया भेटला आज! दोनदा निटची परीक्षा दिलेला! दोन्हीवेळेला संधी हुकली! म्हटलं , आता कसं डॉक्टर होणार ? बघू म्हटला! तसंही मला कुठं डॉक्टर व्हायचं होतं. माझ्या आईबाबांनाच डॉक्टरचे आईबाप होण्याची घाई झालेली होती. मला तर आजारी लोकांत राहायला आवडतच नाही बोलला. समाजच आजारी झालाय असं वाटत नाही का तुम्हांला असं विचारून माझीच बोलती बंद केली त्यानं. रुग्णसेवा वगैरे जड शब्द फेकले तर तो हसायलाच लागला! फार अभावानं दिसंल कुठं... जरा चक्कर टाकून या म्हटला! बिलं पाहून बीपी वाढंल ,जरा सावधगिरी बाळगा असा सल्लापण दिला. नाटकी जगण्यात आयुष्य खर्च होत चाललंय तुमचं नि आमच्या पिढीचंही.नोकरी, व्यवसाय यालाच आपण करीअर म्हणतोय. नोकरीच्या दोरीवर आयुष्य वाळत टाकणं म्हणजे करीअर नसतं. आपल्या आवडीच्या क्षेत्रात, आवडीचं काम करत जीवनाचा अर्थ शोधत मनसोक्त आनंद मिळवत जगता येणं म्हणजे करीअर! लतांनी गाण्यात, बच्चननं अभिनयात , टेरेसा -आमटेंनी सेवेत, तान्हाजीनं पराक्रमात, मेस्सीनं फूटबॉलमध्ये केलं असं काहीतरी बहुतेक करीअर असावं. रग्गड पैसा म्हणजे करीअर असं ते नसावं बहुतेक! अशी त्यानं त्याची स्पष्ट मतं मांडली. आमचा पीएच.डी. झालेला मेंदूही अवाक करून टाकला स्वारीनं. पोर एवढं गंभीरपणं आयुष्याकडं बघतही हे पाहून त्याचे आईबाबाही अचंबित झालेले दिसले. मग काय करायचं ठरवलं पुढे ? पुन्हा आमचा प्रश्न. तो म्हटला, अजून तरी तसं काही ठरलेलं नाही.... खरं सांगायचं तर अजून तसं काही सापडलेलंही नाही... पण शोध चालू आहे. खूपच प्रांजळ वाटला. चित्रं चांगले जमतात म्हटला,पण डॉक्टरकीच्या नादात सायन्सला जावं लागलं. अजून आमचं कोणत्या डब्यात बसू असंच चाललंय! गळा पण बरा आहे. पण निटनं घसा सुजवला असं गंमतीत बोलला. लाखो विद्यार्थी जातात किंवा जायचं म्हणतात तिकडच्या रेसमध्ये गेल्यावर थोडीफार दमछाक होणारच... पण आपण आपल्याच वाटेनं गेलो तर मजा येते, गर्दीपण नसते,नाही का काका? पुन्हा तगडा प्रश्न .आमची मती गुंग! एव्हाना बल्लूयाला मार्गदर्शन करण्याच्या मोबदल्यात मला प्रेमानं दिलेले चहा-पोहे फुकट गेल्याची जाणीव त्याच्या मातापित्यांना झालीच होती.आजचा दिवस आपला नाही असं समजून आम्हीही काढता पाय घेतला. बोलू पुन्हा निवांत म्हणत , बल्लूसह परिवाराचा निरोप घेतला. पायी चालण्यात व्यायाम किती होतो माहीत नाही...पण माणूस जरा निवांत विचार करू शकतो हे मात्र खरं! मी विचार करतच चालत होतो. हल्ली विचार करायलाही वेळ मिळत नाही... नाही का ? माझा एक मित्र गंमतीनं म्हणत असतो,हल्ली तर मी विचार करण्याचा 'विचार ' सुद्धा मनात आणत नाही. करीअर मार्गदर्शन वगैरे गोष्टी जरा भंपकच वाटल्या आज. खाडकन् अशी मुस्कटात बसल्याशिवाय माणूस जाग्यावर येत नाही हेच खरं! करीअर तरी काय आपलं दोन- तीनच क्षेत्रांत कुंठीत झालेलं: एक डॉक्टर ,दुसरं इंजिनीअर अन् तिसरं एमपीएस्सी- युपीएस्सी बस्स! चांगले लेखक, कवी, अभिनेते,प्राध्यापक,शिक्षक, खेळाडू , शास्त्रज्ञ, कायदेतज्ज्ञ, अर्थशास्त्री , अभिनेते, समाजधुरंधर, राजकारणी, गणिती , नकलाकार, कीर्तनकार, व्याख्याते, प्रबोधनकार , गायक, इतिहासकार, खगोलशास्त्रज्ञ,शाहीर,हवामान अभ्यासक, उद्योजक, कृषिवल इत्यादी इत्यादी नकोहेत का आपल्याला ? जाऊद्यानं पोरांना जरा नव्या वाटांनी! अहो, स्टॅन्डअप कॉमेडीचं मार्केटही वार्षिक दीडशे कोटींपर्यंत पोहोचलंय म्हणतात!त्याच रुळलेल्या , मळलेल्या वाटा तुडवून पैशांशिवाय असं कुठलं समाधान भेटतंय बरं ! मर मर अभ्यास करून मरतात हो पोरं! त्यात ढगफुटीपेक्षा भयानक पेपरफुटी! तीन तासांच्या पेपरसाठी आयुष्य पणाला लागतंय! व्यवस्थे इतकाच पोरांना मरणाच्या खाईत ढकलणारा समाजही तितकाच दोषी आहे असं नाही का वाटत? स्पर्धेचे गळफास पोरांच्या गळ्याभोवती करकचून आवळले जात आहेत. रोगट पिढी निर्माण करण्यात आपण सगळेच कळत न कळत हातभार लावत आहोत. भ्रष्ट मार्गाने जात सोनेरी दिवसांचे शेखचिल्लीचे स्वप्न आपण पाहतो आहोत, तो नाही का! ज्या फांदीवर बसायचा तीच तोडायचा! अन् फांदीसहीत खाली यायचा. जागा कमी आणि लोकसंख्या अफाट यामुळं सरकारही हतबल आहे, ते फक्त परीक्षांच्या चाळण्या लावतातहे , कुणाला वाईट नको वाटायला ;की मला का रिजेक्ट केले म्हणून . मग सोपं उत्तर देता येतं... भैय्या तू मेरिटमध्ये आला नाहीस असं! रिजेक्शन , सिलेक्शन, कलेक्शन पेक्षा सोल्यूशन महत्त्वाचं वाटायला हवं .नापासांचा , स्पर्धेत मागे पडलेल्यांचा स्वीकार नको का करायला ? ... की फक्त चारदहा यशवंतांचेच कौतुकसोहळे रंगवायचे? लाखो रडत असतांना ठरावीक हजारांचेच पेढे चघळत बसायचे का ? खरा आधार तर दुबळ्यांनाच हवा असतो! दुर्दैवानं आपल्या व्यवस्थेत अपयशाची फक्त टिंगल केली जाते, त्यावरील उपाययोजनांचा विचार होत नाही. खेड्यापाड्यातली पोरं तर आजही निट , जे डबल ई, सीईटी असे शब्द डायरेक्ट बारावीला गेल्यावरच ऐकतात. त्यांच्याकडं टॅलेन्ट नाही का ? तरुणांच्या तरुण देशात तारुण्याची अशी आबाळ परवडेल का ? नुसत्या कल चाचण्या घ्यायच्या की त्यांना स्वतःच्या कलाप्रमाणे करीअर घडवण्यासाठी मदत नि मार्गदर्शन करायचे ? यांवर गंभीरपणे विचार केल्याशिवाय युवापिढी खंबीरपणे पुढे कशी जाणार? वाघासारख्या पोरांचं मातेरं करून कोणती महासत्ता घडवायचीहे आपल्याला?.... आणि कुणासाठी? एकदा तरी पाच वर्षांचं पुरं बजेट फक्त शिक्षण, उद्योग आणि शेतीसाठी खर्च करायला हवं . चालता चालता विचारांची अशी बरीच खळबळ डोक्यात माजली होती. घर जवळ आलं. सामान्य माणसाची एक गंमत असते, घरी आला की तो जगाचे प्रश्न विसरतो!... स्वतःच्या घरचे प्रश्नच त्याला जागतिक प्रश्न वाटू लागतात. खा मुकाट मार ... आपल्या हातात दुसरं आहे तरी काय?..... पण तरीसुद्धा पुन्हा एकदा बल्लूला भेटायलाच हवं . आशाहे की कदाचित पोरंच काहीतरी मार्ग काढतील .

**– डॉ. संजय गोर्डे**

**संपर्क: ८६६८५७८३ ९३**

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# भंडारदरात पावसाचे पुनरागमने भात अवनीस वेग...

छाया- विलास तुपे, राजूर



## धबधबेही कोसळू लागले



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर- बरेच दिवसाच्या विश्रांतीनंतर भंडारदरा परिसरात मान्सूनने पुन्हा एकदा जोरदार हजेरी लावली आहे. भंडारदरा, घाटघर,पांजरे परिसरात भात अवनीस वेग आला आहे. सह्याद्रीच्या कुशीत विसावलेल्या या निसर्गनगरीला वेढले आणि संततधार पावसाला सुरुवात झाली. या पावसामुळे अवघा परिसर पुन्हा एकदा हिरवाईने न्हाऊन निघाला असून, शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आणि पर्यटकांच्या मनात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

भात लागवडीसाठी शेतात पुरेसे पाणी नसल्याने अनेक शेतकऱ्यांची रोपे शेतातच सुकू लागली होती. मात्र गेल्या दोन दिवसात भंडारदरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पुन्हा चांगला पाऊस सुरु झाल्याने ओढे, नाले तुडूंब भरून वाहू लागले आहेत. शेतात गुडघाभर पाणी साचले असून, सकाळपासूनच शेतकरी बांधवांनी चिखलात उतरून भात लावणीला सुरुवात केली आहे. शेतात महिलांच्या भात लावणीच्या गाण्यांनी आणि लगबगीने पुन्हा एकदा शेतीला जिवंतपणा आला आहे. एका अर्थाने हा पाऊस बळीराजासाठी नवसंजीवनी ठरला आहे.

मान्सूनचा हा पाऊस पर्यटनासाठी देखील वरदान ठरला आहे. डोंगरदऱ्यांवरून फेसळणारे धबधबे स्वतःला झोकून देत आहेत. सगळीकडे अल्हाददायक वातावरण तयार झाल्याने पर्यटकांच्या आनंदाला मनमोहक रूप धारण केले आहे. . धुक्यात हरवलेले कळसूबाई शिखर, हिरवीगार दरी आणि कोसळणारे धबधबे पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी वाढू लागली आहे. बोटिंग व्यावसायिकांमध्ये देखील उत्साहाचे वातावरण आहे. एकंदरीत, भंडारदऱ्यात बरसलेला हा पाऊस केवळ पाणी नाही तर बळीराजाच्या डोळयातील अश्रू पुसण्याबरोबरच पर्यटकांच्या मनातील मरगळ घालवणारा ठरला आहे. भंडारदरा धरणात पाण्याची आवक वाढत असून धरण ६२ टक्के भरले आहे.

# अतिक्रमण हटाव की निवडक तोडफोड ?

## निमाई स्वीट्सचे लाखोंचे नुकसान, व्यापाऱ्यांचा संताप



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरात नगरपरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने पोलीस बंदोबस्तात राबविण्यात आलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेनंतर आता कारवाईच्या पद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. अतिक्रमण हटविण्याला कुणाचाही विरोध नसला, तरी अतिक्रमण नसलेल्या खासगी मालमत्तेवर बुलडोझर चालवून लाखो रुपयांचे नुकसान केल्याचा आरोप व्यापाऱ्यांनी करत तीव्र संताप व्यक्त केला आहे.

या कारवाईत गणेशनगर येथील प्रसिद्ध निमाई स्वीट्स या दुकानाच्या दर्शनी भागावरील फ्लेक्स व इतर साहित्य तोडण्यात आल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा दुकानाच्या संचालकांनी केला आहे. विशेष म्हणजे संबंधित दुकान अतिक्रमणात नसून वाहतुकीला कोणताही अडथळा येत नव्हता असा त्यांचा दावा आहे.

शहरातील प्रमुख रस्त्यांवर झालेल्या अतिक्रमणामुळे वाहतुकीची मोठी समस्या निर्माण झाली होती. याबाबत वारंवार तक्रारी आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार नगरपरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पोलीस प्रशासनाने संयुक्त कारवाई हाती घेतली. मात्र कारवाईदरम्यान अधिकाऱ्यांनी कोणतीही पूर्वसूचना किंवा नोटीस न देता थेट जेसीबीच्या सहाय्याने तोडफोड केल्याचा आरोप व्यापाऱ्यांनी केला आहे. व्यापाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित जागेवर प्रत्यक्षात अतिक्रमण आहे की नाही, याची खातरजमा न करता कारवाई करण्यात आली. नियमांनुसार संबंधितांना नोटीस देऊन भूमिका मांडण्याची संधी देणे अपेक्षित असताना ती प्रक्रिया पूर्णपणे डावलण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

निमाई स्वीट्सच्या संचालकांनी प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर आक्षेप घेत, अतिक्रमण नसताना आमच्याच दुकानावर बुलडोझर का चालवला? इतर अनेक व्यावसायिक आस्थापनांवर अशी कारवाई का झाली नाही? असा सवाल उपस्थित केला आहे. कारवाईदरम्यान दुकानाच्या दर्शनी भागाचे व बोर्डाचे मोठे नुकसान झाल्याने आर्थिक फटका बसल्याचे त्यांनी सांगितले.

नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्गालगत अनेक व्यावसायिक आस्थापना असूनही त्यांच्यावर कारवाई न करता केवळ निमाई स्वीट्सलाच लक्ष्य करण्यात आल्याचा आरोप करत, अतिक्रमण हटाव मोहिमेत सर्वांसाठी समान निकष आणि पारदर्शक प्रक्रिया अवलंबावी, तसेच झालेल्या नुकसानीची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी व्यापाऱ्यांकडून करण्यात आली आहे.

# संतांचे संगती... आत्मज्ञानाची प्रगती

## पतीसेवेतून पंढरी गाठणारी विठ्ठलवेडी माऊली - संत सखुबाई

सखूचा तो भाव भोळा।
विठ्ठल चरणी जडला डोळा।।



वारकरी परंपरा म्हणजे फक्त पुरुष संतांची नाही, तर घरदार सांभाळून, सर्व यातना सहन करूनही विठ्ठलाशी एकरूप झालेल्या स्त्री-संतांची आहे. संत जनाबाई, सोयराबाई यांच्यासोबत संत सखुबाईंचे नाव आदराने घेतले जाते. त्यांचे चरित्र म्हणजे सोशिकता, निष्ठा आणि भक्तीच्या बळावर अशक्य ते शक्य करून दाखवणारी कथा आहे.

जन्म आणि बालपण

संत सखुबाईंचा काळ साधारण १४ वे ते १५ वे शतक मानला जातो. त्यांचा जन्म सातारा जवळील करवीर परिसरात एका गरीब पण धार्मिक कुटुंबात झाला. लहानपणापासूनच त्यांच्या मुखात विठ्ठलाचे नाव होते. खेळतानाही त्या मातीचा विठ्ठल बनवून त्याची पूजा करायच्या.

**सासरचा जाच**

सखुबाईंचा विवाह कृष्णा काठच्या एका कर्मठ आणि गर्विष्ठ कुटुंबात झाला. सासू, सासरे आणि पती अत्यंत कडक स्वभावाचे होते. त्यांना सखुबाईंची भक्ती अजिबात आवडत नसे. सकाळपासून रात्रीपर्यंत सखुबाईंना दळण, शेणकाढणे, भांडी, पाणी भरणे अशी सर्व कामे करावी लागत. एवढे करूनही पोटभर अन्न मिळत नसे आणि शिव्याशाप वेगळेच. तरीही त्या काम करता मनात विठ्ठल विठ्ठल हाच जप करत असत. हेच त्यांचे बळ होते.

**वारीची ओढ आणि चमत्कार**

एकदा आषाढी वारीचा काळ आला. गावातून दिंड्या पंढरपूरला निघाल्या होत्या. पुंडलिक वरदे हरी विठ्ठलचा गजर ऐकून सखुबाईंचे मन व्याकुळ झाले. त्यांनी सासू-पतींना वारीला जाण्याची परवानगी मागितली. पण संतापलेल्या कुटुंबाने त्यांना मारहाण केली आणि घरातील खांबाला साखळदंडाने बांधून अन्नपाणी न देता शेतावर निघून गेले.

अंधाऱ्या खोलीत बांधल्या गेलेल्या सखुबाईंनी डोळ्यात पाणी आणून विठ्ठलाला हाक मारली, देवा, मी तुझी भक्त असेन तर मला या बंधनातून सोडव.

भक्ताची आर्त हाक ऐकून पंढरपूरचा पांडुरंग स्वतः एका स्त्रीचे रूप घेऊन तिथे आला. त्याने सखुबाईंना सांगितले, सखू, मी तुझ्या जागी इथे बांधून घेतो. तू वारीला जा. देवाने त्यांचे बंधन सोडले आणि स्वतःला खांबाला बांधून घेतले. सखुबाई आनंदाने वारकऱ्यांच्या दिंडीत सामील होऊन पंढरपूरला निघाल्या.

**पंढरीत देहत्याग आणि सासरी विठ्ठल**

दुपारी घरी आल्यावर सासू-पतींनी सखू ला काम करताना पाहिले. पण ती दुसरी कोणी नसून साक्षात विठ्ठल होता. त्याने झाडू मारला, भांडी घासली, विहिरीवरून पाणी भरले. सासूलाही नवल वाटले की आज सखू एवढी शांतपणे आणि चांगले काम कशी करत आहे.

तिकडे पंढरपुरात पोहोचलेल्या खऱ्या सखुबाईंनी चंद्रभागेत स्नान केले आणि विठोबाचे दर्शन घेतले. माझ्यासाठी जो सासरी जाच सोसतो आहे तोच हा विठ्ठल आहे हे समजताच त्यांनी देवाच्या चरणी डोके ठेवले आणि चंद्रभागेच्या वाळवंटातच देह सोडला. वारकऱ्यांनी त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले.

संध्याकाळी विहिरीवर पाणी भरून झाल्यावर विठ्ठलाने घागर ठेवली आणि अंतर्धान पावला. सखू कुठे गेली म्हणून शोधाशोध सुरू झाली. तेवढ्यात वारीहून आलेल्या लोकांनी सांगितले की सखू पंढरपुरात विठ्ठलाच्या चरणी देह ठेवून गेली. हे ऐकून सासरचे लोक हादरले. आपल्या घरात काम करणारी दुसरी कोणी नसून देव होता हे कळल्यावर त्यांना पश्चात्ताप झाला.

**पुनर्जीवन आणि उपदेश**

म्हणतात की विठ्ठलाने सखुबाईंची भक्ती जगाला दाखवण्यासाठी त्यांना पुन्हा जिवंत केले. घरी परतलेल्या सखुबाईंच्या पाया पडून पती आणि सासूने क्षमा मागितली. त्यानंतर संपूर्ण घर विठ्ठलमय झाले.

**साहित्य आणि शिकवण**

सखुबाईंनी मोठे ग्रंथ लिहिले नाहीत, पण त्यांचे काही अभंग अतिशय गोड आणि आर्त आहेत. त्यात स्त्रीच्या दुःखाचे आणि त्यावर भक्तीने मिळणाऱ्या समाधानाचे चित्र आहे.

**त्यांचा प्रसिद्ध अभंगः**

**सासू जाच करी, पती मारी मज।**
**तळमळ अहोरात्र विठ्ठला तुज।।**
**घेई धाव वेगी, नको करू उशीर।**
**तुझ्या दर्शनाने सुखावेल शरी।।**

आजच्या काळासाठी संदेश

१. मनाचे स्वातंत्र्य: बाह्य बंधने कितीही कडक असली तरी मन शुद्ध आणि निष्ठावान असेल तर देवाला ते रोखता येत नाही.

२. कष्टाचे महात्म्य: साक्षात भगवंताने सखू बनून घरकाम केले. यातून श्रमाची आणि सेवेची किंमत कळते.

३. निजध्यासाची ताकद: जेव्हा भक्तीचा ध्यास लागतो तेव्हा देवालाही भक्ताचे दास्यत्व स्वीकारावे लागते.

संत सखुबाईंचे जीवन आपल्याला शिकवते की परिस्थिती कितीही कठीण असली तरी श्रद्धा आणि संयमाने आपण पंढरी गाठू शकतो. त्यांची कथा आजही प्रत्येक संसारी माणसाला आधार देते.



संकलन, संतचरणरज...
**श्री. सदाशिव रामनाथ मुळे**
(पुणे युवावार्ता, प्रतिनिधी), मो . ८६६८३२७१७४
सौजन्य - निजध्यास...

# नगराध्यक्ष वडजे यांच्याविरुद्धचा अविश्वास ठराव मंजूर

अकोले (प्रतिनिधी)

अकोले नगरपंचायतचे नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे यांच्या विरुद्ध दाखल झालेल्या अविश्वास ठरावावर शुक्रवारी (दि.१७) झालेल्या विशेष सभेत बारा सदस्यांनी शिक्कामोर्तब केले. नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष यांच्यासह पाच सदस्य या सभेला अनुपस्थित होते. ठरावाला १७पैकी १२ म्हणजे दोन तृतीयांश सदस्यांचा पाठिंबा मिळाल्यामुळे ठराव मंजूर झाल्याची घोषणा पिठासीन अधिकारी तथा संगमनेर विभागाचे उपविभागीय अधिकारी अरुण उंडे यांनी केली.

माजी आमदार वैभव पिचड

व नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे यांना भाजप अंतर्गत कुरघोडीचा फटका बसला आहे. नगरपंचायतमध्ये मागील तीन महिन्यापासून भाजप अंतर्गत संघर्षामुळे नगराध्यक्ष वडजे यांना आपले पद गमवावे लागले. भाजपचे आठ बंडखोर सदस्य व शिवसेना उबाठा गटाचे दोन सदस्य असे दहा सदस्य शिवसेनेच्या शिंदे गटात लवकरच सामील होणार असल्याची चर्चा आहे. दरम्यान पक्षाने नगराध्यक्ष वडजे यांचा राजीनामा मागितला नव्हता, पक्षाचा आदेश असता तर त्यांचा राजीनामा घेतला असता असे मत माजी आमदार पिचड

यांनी व्यक्त केले. जे सदस्य पक्षनिष्ठ राहिले त्यांचे मी अभिनंदन करतो असेही पिचड यांनी सांगितले. अविश्वास ठरावाच्या निमित्ताने एकत्र आलेल्या भाजप बंडखोर, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि शिवसेना (उबाठा) या

तीन पक्षाच्या नगरसेवकांची एकी केवळ सत्तेपुरतीच असल्याची चर्चा आहे. त्यामुळे पदाधिकारी निवडीवरून त्यांच्यात



मतभेद उफाळण्याची शक्यता असल्याचे बोलले जाते आहे.

मोजी नगराध्यक्षा सोनाली

नाईकवाडी व अन्य बारा सदस्यांनी २० मे रोजी नगराध्यक्ष वडजे व उपनगराध्यक्ष शरद नवले यांना पदावरून काढून टाकण्याची मागणी पत्राद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती. या मागणीबाबत निर्णय घेण्यासाठी उपविभागीय अधिकारी अरुण उंडे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी विशेष सभा बोलाविण्यात आली होती.

या सभेस विद्यमान नगराध्यक्ष वडजे, उपनगराध्यक्ष नवले, पाणीपुरवठा समितीच्या सभापती शीतल वैद्य, बांधकाम समितीच्या सभापती वैष्णवी धुमाळ व काँग्रेसचे एकमेव नगरसेवक प्रदीपराज नाईकवाडी

या सभेस अनुपस्थित राहिले. नगरपंचायतमध्ये भाजप १२, शिवसेना २, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) २ आणि काँग्रेसचा १ असे १७ सदस्य आहेत. उपस्थित बाराही सदस्यांनी ठरावाचे समर्थन केले. दोन तृतीयांश सदस्यांचा पाठिंबा मिळाल्यामुळे अविश्वास ठराव मंजूर झाल्याचे प्रांताधिकारी उंडे यांनी जाहीर केले. मात्र, ही राजकीय आघाडी केवळ सत्तेपुरती की नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष बदलापुरतीच की, शहरात या बदलातून काही नवीन राजकीय समीकरणे उदयास येतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## जाहिरात

उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) जिल्हा अहिल्यानगर अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या प्रभागसंघाच्या माध्यमातून कर्जत, राहाता, जामखेड, श्रीगोंदा, नेवासा आणि संगमनेर या सहा तालुक्यातील एकात्मिक शेती विकास प्रकल्पांतर्गत खालील पदे भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. न. | पद | पदसंख्या | |
|---|---|---|---|
| १ | IFC BLOCK ANCHOR | ०६ | प्रती तालुका १ पद |
| २ | Senior CRP (वरिष्ठ समुदाय संसाधन व्यक्ती) | १८ | प्रती तालुका ३ पदे |

उपरोक्त पदाकरिता ठोक मानधन तत्वावर (कंत्राटी तत्वावर) प्रभागसंघाच्या अंतर्गत निवड करण्यासाठी दि. ३१/०७/२०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे. याबाबत सविस्तर माहिती, अनुभव, शैक्षणिक पात्रता व अर्जाचा नमुना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अहिल्यानगर यांच्या https://nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. सदरहू जाहिरातीत बदल। पद संख्येत बदल / निवड प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार प्रभाग स्तरीय निवड समिती यांनी राखून ठेवले आहेत.

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,**
**अहिल्यानगर**

# संपादकीय...

## अपेक्षा- प्रवासी सेवेचा दर्जा व गुणवत्ता वाढीची

प्रवाशांना एसटी बसस्थानक, बसस्थानकांवरील प्रसाधनगृहे ही स्वच्छ, निर्जंतुक आणि टापटीप असावीत असे वाटते. तसेच एसटी बसेस स्वच्छ व वेळापत्रकानुसार वेळेत मार्गस्थ व्हाव्यात, ठरलेले थांबे घ्यावेत, चालक-वाहक यांनी प्रवाशांशी सौजन्याने वागावे. कमी केलेल्या बसफेऱ्या पुनश्च सुरू कराव्यात. प्रवाशी संख्या विचारात घेऊन ज्यादा बसफेऱ्या वाढवाव्यात. रस्ता तयार असलेल्या गावांसाठी नवीन बसफेऱ्या सुरू कराव्यात. हात दाखवा, गाडी थांबवा ही योजना पुन्हा नियमितपणे राबवली जावी, अशी किमान अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त केली जात आहे. एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या समस्या, तक्रारी वजा सूचना यांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निराकरणासाठी आता राज्यातील प्रत्येक आगार- डेपोमध्ये दर सोमवारी व शुक्रवारी एसटी प्रवासी राजा दिन आयोजित केला जाईल. त्यानुसार एसटीच्या विभाग नियंत्रकांना एका आगारात जाऊन प्रवाशांच्या समस्या, तक्रारी, सुचना ऐकून घ्याव्या लागणार आहेत. प्रवासी आपला आराध्य दैवत; तर परिवहन विभाग उपासक! असेच काहीसे चित्र दिसेल. एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्या भन्नाट संकल्पनेतून हा प्रयोग राबवला जाणार आहे. एसटी महामंडळाने या प्रकल्पानुसार प्रवाश्यांच्या समस्यांना गांभिर्याने घेत त्या तातडीने सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजनेसाठी हा उपक्रम राबवण्याचे निश्चित केले आहे. त्यामुळे प्रवाशांचे समाधान होऊन प्रवासी सेवेचा दर्जा व गुणवत्ता वाढण्यास मदत होईल. ही अभिनव योजना दि.१५ जुलै २०२४पासून सुरू झाली आहे. शहरी व खेडूत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी-शिक्षक आपल्या समस्या-तक्रारी, सुचना लेखी स्वरूपात दर सोमवारी व शुक्रवारी संबंधित आगारात सकाळी १० ते २ या वेळेत मांडू शकतात. त्यावर विभाग नियंत्रक तातडीने कार्यवाही करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. प्रवासी राजा दिन कोणत्या दिवशी कोणत्या आगारात होणार आहे, याचे वेळापत्रक विभाग नियंत्रक त्या त्या वेळी जाहीर करतील. विशेष म्हणजे प्रत्येक लेखी तक्रारीची नोंद ठेवण्यात येणार असून याबाबत काय कार्यवाही केली आहे, यावर मध्यवर्ती कार्यालय लक्ष ठेवणार आहे. त्यावर योग्य कार्यवाही तसेच तक्रारदारांचे समाधान करणारी योग्य उपाययोजना करणे संबंधीत कार्यालयास भाग पडणार आहे, असा विश्वास वाटतो. एसटीच्या विविध बसेस मधून दररोज सुमारे ५४ ते ५५ लाख प्रवाशांची सुरक्षित वाहतूक केली जाते. प्रवाशांना एसटी बसस्थानक, बसस्थानकांवरील प्रसाधनगृहे ही स्वच्छ, निर्जंतुक आणि टापटीप असावीत असे वाटते. तसेच एसटी बसेस स्वच्छ व वेळापत्रकानुसार वेळेत मार्गस्थ व्हाव्यात, ठरलेले थांबे घ्यावेत, चालक-वाहक यांनी प्रवाशांशी सौजन्याने वागावे. कमी केलेल्या बसफेऱ्या पुनश्च सुरू कराव्यात. प्रवाशी संख्या विचारात घेऊन ज्यादा बसफेऱ्या वाढवाव्यात. रस्ता तयार असलेल्या गावांसाठी नवीन बसफेऱ्या सुरू कराव्यात. हात दाखवा, गाडी थांबवा ही योजना पुन्हा नियमितपणे राबवली जावी, अशी किमान अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त केली जाताहे. यासंबंधित प्रवाशी तक्रारींचे निराकरण वेळेत न झाल्याने प्रवाशांना गैरसोईचा सामना करावा लागतो. या समस्यांचे निराकरण स्थानिक पातळीवर तातडीने होऊ शकते. प्रवासी सेवेचा दर्जा आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रवाशांच्या समस्यांचे वेळीच निराकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. तसे झाल्यास प्रवाशांना समाधानकारक सेवा देणे एसटी महामंडळाला शक्य होणार आहे. अर्थात, प्रवाशांचे महत्तम समाधान हा उद्देश ठेऊन मागील दि.१५ जुलै २०२४ पासून प्रवासी राजा दिन या अभिनव योजनेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व प्रवासी बंधू-भगिनींनी या योजनेचा लाभ घेऊन आपल्या समस्यांचे निराकरण करुन घ्यावे आणि आपले एसटी बसवरील प्रेम, विश्वास, निष्ठा व गरज आजही काही कमी झाले नाही, हे सिद्ध करून दाखवावेच. प्रवासी सेवेचा दर्जा आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रवाशांच्या समस्यांचे वेळीच निराकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. तसे झाल्यास प्रवाशांना समाधानकारक सेवा देणे एसटी महामंडळाला शक्य सोयीचे होणार आहे.

पान १ वरून

## चमच्यांविरोधात...

अफवांना बळी न पडण्याचे आवाहन करत, आज नाही तर कधीच नाही या निर्धाराने मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हा संघर्ष कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून, निष्ठावंत कार्यकर्त्यांवर होत असलेल्या अन्यायाविरोधातील असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या मेळाव्यात प्रत्येक कार्यकर्त्याला आपल्या भावना, वेदना आणि अपेक्षा थेट साहेबांसमोर मांडण्याची संधी मिळणार असल्याचे सांगण्यात आले आहे. पक्षाच्या भविष्यासाठी आणि कार्यकर्त्यांच्या सन्मानासाठी हा संवाद महत्त्वाचा असल्याचे आयोजकांनी म्हटले आहे. योगेश शिंदे यांनी संगमनेर तालुक्यातील सर्व निष्ठावंत कार्यकर्ते, युवा वर्ग आणि सामान्य कार्यकर्त्यांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या हक्काचा आवाज नेतृत्वापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले आहे. निष्ठेचा सन्मान आणि कार्यकर्त्यांना न्याय मिळावा, यासाठी सर्वांनी एकजुटीने पुढे यावे, असेही त्यांनी आवाहनात म्हटले आह

# राम कृष्ण हरी : वारकरी संप्रदायाचा बीजमंत्र



वारकरी संप्रदायातील दोन वारकरी एकमेकांना भेटले की त्यांच्या मुखातून सहजपणे उमटणारे शब्द म्हणजे राम कृष्ण हरी. हा केवळ अभिवादनाचा मंत्र नसून, वारकरी परंपरेचा बीजमंत्र आहे. कल्पवृक्षाप्रमाणे हा मंत्र भक्तांच्या जीवनात समाधान, शांती आणि सकारात्मकतेचे फळ देणारा आहे. या मंत्राच्या अखंड नामस्मरणाने मन प्रसन्न होते, अंतःकरण शुद्ध होते आणि भक्ताला ईश्वराशी एकरूप होण्याचा अनुभव प्राप्त होतो.

संतांनी सांगितलेला हा मंत्र आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक अशा तिन्ही प्रकारच्या तापांपासून मुक्ती देणारा मानला आहे. आध्यात्मिक ताप म्हणजे स्वतःच्या मन आणि शरीरातून निर्माण होणारे काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर यांसारखे विकार. आधिभौतिक ताप म्हणजे इतर व्यक्ती, सजीव-निर्जीव घटक किंवा परिस्थितींमुळे होणारे दुःख, तर आधिदैविक ताप म्हणजे अतिवृष्टी, दुष्काळ, भूकंप, चक्रीवादळ, वीज पडणे यांसारख्या नैसर्गिक आपत्ती. या सर्व दुःखांवर मात करण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे राम कृष्ण हरी या मंत्राचे अखंड स्मरण.

ह.भ.प. सुकुमार गौरदास महाराज सांगतात की, हा मंत्र माणसाला अंतःकरणातून आनंद देणारा आहे. रमते इति राम - जो हृदयात रमतो तो राम. प्रभू रामचंद्र मनाला शांती, स्थैर्य आणि सदाचाराची प्रेरणा देतात. ऋषी-मुनींनाही ज्यांच्या स्मरणातून आनंद प्राप्त होतो, तोच राम भक्तांच्या जीवनात शांततेचा दीप प्रज्वलित करतो.

कर्षति आकर्षती इति कृष्णः - जो प्रेमाने सर्वांना आकर्षित करतो तो कृष्ण. मानवी मन चंचल असते; ते सतत विविध विषयांकडे धावत असते. परंतु भगवान श्रीकृष्णाचे दर्शन, त्यांचे रूप, त्यांचे प्रेम आणि त्यांचे तत्त्वज्ञान मनाला स्वतःकडे खेचून घेते. कृष्ण म्हणजे प्रेम, आकर्षण आणि जीवनातील आनंदाचा स्रोत.

हरी म्हणजे जो सर्व दुःख, क्लेश आणि ताप हरून घेतो. संत ज्ञानेश्वर माऊली म्हणतात, हरी हरी मंत्र शिवाचा. प्रभू रामचंद्र मनाला शांती देतात, भगवान श्रीकृष्ण मनाला प्रेमाने आकर्षित करतात आणि हरी मनातील अशुद्धता दूर करून भक्ताला निर्मळ करतो. रामांचा आदर्श आचार, कृष्णांचा जीवनदायी विचार आणि हरीचे आश्वासक रूप भक्ताच्या जीवनाला नवी दिशा देतात.

म्हणूनच राम कृष्ण हरी या मंत्रात विलक्षण आध्यात्मिक सामर्थ्य आहे. आज हजारो वारकरी पंढरपूरच्या वाटेवर विठ्ठलाच्या दर्शनासाठी आनंदाने चालत असतात. कठीण प्रवास, साधी राहणी, गादी-उशीचा अभाव, कष्टप्रद दिनक्रम-यापैकी कोणतीही गोष्ट त्यांना खचवत नाही. कारण त्यांच्या मुखी सतत राम कृष्ण हरी हा मंत्र असतो. त्यांच्या प्रत्येक पावलागणिक विठ्ठल त्यांच्या अंतःकरणात वसलेला असतो. प्रत्यक्ष दर्शन होण्यापूर्वीच त्यांच्या मनात विठ्ठलाचे दर्शन घडलेले असते.

या मंत्रात तीन शब्द आहेत आणि हे तीन शब्द भक्ताच्या हृदयात ज्ञान, कर्म आणि भक्ती यांची समई प्रज्वलित करतात. त्याचप्रमाणे पंढरपूर या महान योगपीठात परब्रह्म पांडुरंगाचे वास्तव्यही तीन स्वरूपांत असल्याचे सांगितले जाते.

पहिले वास्तव्य म्हणजे श्रीविठ्ठलाच्या मूर्तीत. आद्य शंकराचार्यांनी पंढरपूरला येऊन विठ्ठलाचे दर्शन घेतले आणि त्यांच्या मुखातून प्रकट झालेले स्तोत्र म्हणजे पांडुरंगाष्टक.

दुसरे वास्तव्य म्हणजे चंद्रभागा नदी. भीमा नदीला चंद्रभागा असेही म्हणतात. भक्त पुंडलिकाच्या विनंतीनुसार भगवान या तीर्थरूपाने येथे वसले, अशी श्रद्धा आहे. म्हणूनच पंढरपूरला येणारा प्रत्येक वारकरी प्रथम चंद्रभागेत स्नान करून नंतर विठ्ठलाचे दर्शन घेतो.

तिसरे वास्तव्य म्हणजे पंढरपूरची ही पवित्र भूमी. संत नामदेव म्हणतात, तृण आणि पाषाण हेही देव जाणावे. या भूमीतील प्रत्येक कण भक्तासाठी देवस्वरूप आहे.

राम कृष्ण हरी या मंत्रातील तीन शब्द, ज्ञान-कर्म-भक्तीची त्रिवेणी, पांडुरंगाचे त्रिविध वास्तव्य आणि विठ्ठल या नावातील तीन अक्षरे-या सर्वांमध्ये एक अद्भुत आध्यात्मिक साम्य दिसून येते. हा मंत्र माणसाच्या जाणीवा व्यापक करतो, संकुचित विचार दूर करतो आणि जीवनाला भक्ती, प्रेम व समतेचा मार्ग दाखवतो.

म्हणूनच प्रत्येकाने आपल्या मुखी, मनी आणि कृतीत हा मंत्र जपावा-

मुखाने म्हणा राम कृष्ण हरी,
घडेल पंढरीची वारी.

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. ९८९०१६३६४२**

तहसिल कार्यालय, संगमनेर
क्रं.कावि/दंडाधि/वारस/२०२६
दिनांक – १५/०७/२०२६

**तमाम लोकांस कळविण्यात येते की,**

**कै. नंदकिशोर छगनलाल ओझा, रा. संगमनेर, ता. संगमनेर** हे दिनांक १०/०५/२०२६ रोजी मौजे संगमनेर या ठिकाणी मयत झालेले असुन ते संगमनेर नगरपरिषद संगमनेर, ता. संगमनेर येथे कामगार या पदावर सेवानिवृत्ती वेतनधारक होते त्यांना वारस खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांची नावे | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १. | शोभा नंदकिशोर ओझा | ७० वर्ष | पत्नी |
| २. | आशिष नंदकिशोर ओझा | ४४ वर्ष | मुलगा |
| ३. | अमित नंदकिशोर ओझा | ४० वर्ष | मुलगा |
| ४. | सारिका देविल जोशी | ४६ वर्ष | मुलगी |
| ५. | राधिका महेश ओझा | ४२ वर्ष | मुलगी |

वरील प्रमाणे मयतास वारस असून या व्यतिरिक्त मयतास दुसरे कोणीही वारस नाहीत. या वारसपत्राबाबत कोणास काही हरकत तक्रार घ्यावयाची असल्यास ती आज पासुन कार्यालयीन कामकाजाचे ७ दिवसांचे आत या कार्यालयास सादर करावी. तक्रार न आल्यास **श्रीमती. शोभा नंदकिशोर ओझा, रा. संगमनेर, ता.संगमनेर जि. अहिल्यानगर** यांना वारसाचा दाखला (हिअरशिप सर्टिफिकेट) प्रदान करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस यास **श्रीमती. शोभा नंदकिशोर ओझा, रा. संगमनेर ता.संगमनेर जि.अहिल्यानगर** यांचे अर्जावरुन दिली असे.

(अमोल निकम)
**तहसिलदार, संगमनेर**


**छोट्या जाहिरातासाठीसंपर्क करा**
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०


## निवृत्ती गोर्डे यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

कोपरगाव- तालुक्यातील रांजणगाव देशमुख येथील माजी पोलिस पाटील निवृत्ती लहानू गोर्डे (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात अशोक, प्रकाश, कैलास, बाबासाहेब व संजय मुले, तर लता आहेर व विजया आभाळे मुली आहेत. निवृत्ती गोर्डे यांनी सलग ४० वर्षे पोलिस पाटील म्हणून सेवा बजावली. गावाच्या विकासासाठी, सामाजिक ऐक्यासाठी आणि जनहिताच्या प्रत्येक कार्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. निवृत्ती गोडगे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.


SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL
Daily Yuvavarta

**पाहिजेत**
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरु मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424








## कारागृहात 'सहाय्यक योग प्रशिक्षक' प्रशिक्षणाला प्रारंभ

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त जिल्हा कारागृहात जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि जन शिक्षण संस्था, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहाय्यक योग प्रशिक्षक' या कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या नवीन तुकडीस प्रारंभ करण्यात आला.

यावेळी सहाय्यक आयुक्त योगेश उगले, जिल्हा कारागृह अधीक्षक संतोष कवार, जन शिक्षण संस्थेचे संचालक अनिल तांदळे आणि कार्यक्रम अधिकारी शफाकत सय्यद उपस्थित होते. सहाय्यक आयुक्त योगेश उगले यांनी बंदीवानांच्या पुनर्वसन व स्वावलंबनासाठी कौशल्याधारित प्रशिक्षण महत्त्वाचे असून अधिकाधिक बंदीवानांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. कारागृह अधीक्षक संतोष कवार यांनी मागील तुकडीतील प्रशिक्षणामुळे बंदीवानांना झालेल्या फायद्यांची माहिती देत भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतील, असे सांगितले. शिक्षा पूर्ण झाल्यानंतर समाजाच्या मुख्य प्रवाहात परतल्यावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी कौशल्य आत्मसात करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शफाकत सय्यद यांनी केले तर अनिल तांदळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.


**पाहिजेत**
नामांकित व्हॅल्युएशन फर्ममध्ये पुरूष पाहिजेत
पुरुष- 02 जागा
इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा
9860565356

**पाहिजेत**
घरकामासाठी होतकरू महिला कामगार पाहिजे
वेळ ३ ते ७ मालदाड रोड
डॉ. शेवाळे हॉस्पिटल, विद्यानगर, संगमनेर
9822304638

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग – १ जागा
दुकानकामासाठी – ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**फ्लॅट विकणे आहे**
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
8788945208
8208223721

**पाहिजेत**
पेट्रोल पंप वर 2 कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी कृपया संपर्क करावा.
चैतन्य पेट्रोलियम
संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी, ता. संगमनेर
– संपर्क –
8888808397

**पाहिजेत**
मॉम-एबल फर्टिलिटी अँड आयव्हीएफ सेंटर, संगमनेर
आरएमओ (महिला) – १
शैक्षणिक पात्रता : BAMS / BHMS
नर्सिंग स्टाफ (रात्रपाळी) – १
हाऊसकीपिंग मावशी – २
घर कामासाठी मावशी – १
(सकाळी ९ ते सायंकाळी ५)
— संपर्क —
9860477807

**पाहिजेत**
सोनोग्राफी सेंटरसाठी मुलगी पाहिजे
कॉम्प्युटर व इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक
(२ जागा त्वरीत भरणे आहे)
कामाची वेळ दु. १२ ते ८
संपर्क– जाधव सोनोग्राफी सेंटर
मर्चंट बँकेसमोर, नविन नगर रोड, संगमनेर
9307188862

**पाहिजेत**
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849

**पाहिजेत**
हिशोब करण्याकरिता दोन मुले पाहिजे
(कॉम्प्युटर येणे आवश्यक)
ए. जी. एस. टोमॅटो सप्लायर्स
टोमॅटो मार्केट यार्ड, संगमनेर
दुकान क्रमांक : १२३४५
7741816770
9763531663

**पाहिजेत**
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०२
ड्रायव्हर - ०१
सेल्समन - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**पाहिजेत**
ड्रायव्हर - २ (एल.एम.व्ही.)
क्लर्क - २ (पदवीधर)
अकाउंटट - २ (टॅली)
कॉम्प्युटर ऑपरेटर -२ पदवीधर
डॉ. इथापे हॉस्पिटल, संगमनेर
9822791484
9518556933
9370017177

**ड्रायव्हर पाहिजे**
ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा
मॅन्युअरल गेअर गाडीसाठी ०१ जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
– संपर्क –
9117175050

## दिनविशेष

२०२०: भारतात — ब्रह्मपुत्र नदीच्या पुरामुळे १८९ लोकांचे निधनन तर ४० लाख लोक बेघर
१९९६: ऑलिम्पिक — अमेरिकेतील अटलांटा येथे २६व्या स्पर्धांना सुरुवात.
१९९३: बानू कोयाजी — यांना समाजसेवेसाठीचा रॅमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर.
१९८०: ऑलिम्पिक — रशिया मधील मॉस्को येथे २२व्या स्पर्धांना सुरुवात झाली.
१९७६: नेपाळ — देशात सागरमाथा राष्ट्रीय उद्यानाची रचना करण्यात आली.
१९५२: ऑलिम्पिक — फिनलंड मधील हेलसिंकी येथे १५व्या स्पर्धांना सुरुवात.
१९४०: दुसरे महायुद्ध — केप स्पादाची लढाई.
१९०३: टूर डी फ्रान्स — मॉरिस गरीन यांनी पहिली टूर डी फ्रान्स स्पर्धा जिंकली.
१९००: पॅरिस मेट्रो — सेवा सुरु.
१८३२: ब्रिटिश मेडिकल असोसिएशन आणि सर्जिकल असोसिएशन — स्थापना.
१६९२: अमेरिका — देशातील सेलम शहरात चेटकीण असल्याच्या आरोपाखाली स्त्रियांना फाशी देण्यात आली.

## जन्म

९६१: हर्षा भोगले — भारतीय पत्रकार आणि लेखक
१९५५: रॉजर बिन्नी — भारतीय क्रिकेटपटू
१९४६: इलि नास्तासे — रोमानियन टेनिसपटू
१९३८: जयंत नारळीकर — सुप्रसिद्ध खगोल शास्त्रज्ञ, गणितज्ञ — पद्म विभूषण, पद्म भूषण
१९०९: बाल्मनी अम्मा — भारतीय कवी आणि लेखक (निधन: २९ सप्टेंबर २००४ )
१९०२: यशवंत केळकर — भारतीय कवी, कोशकार, इतिहास संशोधक
१९०२: समृतरा राघवाचार्य — भारतीय गायक, निर्माते (निधन: १६ मार्च १९६८ )
१८९९: बालाइ चांद मुखोपाध्याय — भारतीय डॉक्टर, लेखक (निधन: ९ फेब्रुवारी १९८९ )
१८९६: ए. जे. क्रोनिन — स्कॉटिश लेखक (निधन: ६ जानेवारी १९८१ )
१८९४: पर्सी स्पेंसर — मायक्रोवेव्ह ओव्हनचे शोधक (निधन: ८ सप्टेंबर १९७० )
१८३४: एदगार देगास — फ्रेंच चित्रकार (निधन: २७ सप्टेंबर १९१७ )
१८२७: मंगल पांडे — १८५७ च्या बंडातील स्वातंत्र्यवीर (निधन: ८ एप्रिल १८५७ )
१८१४: सॅम्युअल कॉल्ट — अमेरिकन संशोधक

## मृत्यू

९३१: उडा — जपानी सम्राट (जन्म: ५ मे ८६७ )
२०२०: रजत मुखर्जी — भारतीयचित्रपट दिग्दर्शक
२००४: झेन्को सुझुकी — जपानचे पंतप्रधान
१९८०: निहात एरिम — तुर्कस्तानचे पंतप्रधान
१९६८: प्रतापसिंग गायकवाड — बडोद्याचे महाराज (जन्म: २९ जून १९०८ )
१९१३: क्लिमाको कॅल्डेरॉन — कोलंबिया देशाचे १५वे राष्ट्राध्यक्ष, वकील आणि राजकारणी (जन्म: २३ ऑगस्ट १८५२ )
१८८२: फ्रान्सिस बाल्फोर — प्राण्यांच्या वर्गीकरणा विषयी मूलभूत संशोधन करणारे ब्रिटीश निसर्ग शास्त्रज्ञ (जन्म: १० नोव्हेंबर १८५१ )
१५००: मिगुएल दा पाझ — पोर्तुगाल देशाचे राजकुमार (जन्म: २३ ऑगस्ट १४९८ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**१९ जुलै**


## योगायोगातून मायक्रोवेव्ह ओव्हनचा शोध लावणारे पर्सी स्पेंसर



आधुनिक स्वयंपाकघरातील अत्यंत उपयुक्त उपकरणांपैकी एक असलेल्या मायक्रोवेव्ह ओव्हनचा शोध लावण्याचे श्रेय अमेरिकन अभियंता पर्सी लेबारॉन स्पेंसर यांना जाते. १९ जुलै १८९४ रोजी अमेरिकेतील मेन राज्यात त्यांचा जन्म झाला. अत्यंत गरिबीत वाढलेल्या स्पेंसर यांनी औपचारिक शिक्षण कमी असूनही स्वअभ्यासाच्या जोरावर इलेक्ट्रॉनिक्स आणि अभियांत्रिकीमध्ये प्राविण्य मिळवले.दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ते रेथिऑन (Raytheon) कंपनीत रडार तंत्रज्ञानावर काम करत होते. १९४५ मध्ये एका प्रयोगादरम्यान त्यांच्या खिशातील चॉकलेट बार मॅग्नेट्रॉनमधून निर्माण होणाऱ्या मायक्रोवेव्ह किरणांमुळे वितळल्याचे त्यांच्या लक्षात आले. या योगायोगातून त्यांनी अन्न शिजवण्यासाठी मायक्रोवेव्ह ऊर्जेचा वापर करण्याची कल्पना विकसित केली. पुढील प्रयोगांमध्ये त्यांनी पॉपकॉर्न आणि अंडी गरम करून या तंत्रज्ञानाची उपयुक्तता सिद्ध केली.१९४७ मध्ये जगातील पहिला व्यावसायिक मायक्रोवेव्ह ओव्हन 'रडारेंज' (Radarange) बाजारात आला. सुरुवातीला तो मोठा आणि महागडा असला, तरी पुढील काळात त्याचे आधुनिक, लहान आणि परवडणारे रूप विकसित झाले.पर्सी स्पेंसर यांच्या नावावर ३०० हून अधिक पेटंट्स नोंदवले गेले. त्यांच्या शोधामुळे अन्न गरम करणे आणि शिजवण्याच्या पद्धतीत क्रांती झाली. ८ सप्टेंबर १९७० रोजी त्यांचे निधन झाले. आज जगभरातील कोट्यवधी घरांमध्ये वापरला जाणारा मायक्रोवेव्ह ओव्हन हा त्यांच्या कल्पकतेचा आणि वैज्ञानिक जिज्ञासेचा जिवंत वारसा आहे.

## विश्वाच्या रहस्यांचा वेध घेणारे - डॉ. जयंत नारळीकर

जन्मदिन विशेष



भारतीय खगोलशास्त्र आणि विज्ञान क्षेत्राला जागतिक स्तरावर मानाचे स्थान मिळवून देणाऱ्या डॉ. जयंत विष्णू नारळीकर यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. आपल्या संशोधन, विज्ञानप्रसार आणि लेखनाच्या माध्यमातून त्यांनी विज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे मोलाचे कार्य केले. विश्वाच्या उत्पत्ती, रचना आणि विस्तारावरील त्यांच्या संशोधनामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळाली.१९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणितज्ञ, तर आई सुमती नारळीकर या संस्कृतच्या विदुषी होत्या. बालपणापासूनच त्यांच्यावर शैक्षणिक आणि वैज्ञानिक संस्कार झाले. बनारस हिंदू विद्यापीठातून शिक्षण पूर्ण केल्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठात गेले. तेथे जागतिक कीर्तीचे खगोलशास्त्रज्ञ सर फ्रेड हॉयल यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन केले. हॉयल यांच्यासह त्यांनी मांडलेला 'हॉयल-नारळीकर सिद्धांत' (Hoyle–Narlikar Theory of Gravitation) हा खगोलशास्त्रातील महत्त्वाचा सिद्धांत मानला जातो.भारतात परतल्यानंतर त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्था (TIFR) येथे कार्य केले. पुढे १९८८ मध्ये पुण्यात 'आंतरविद्यापीठीय खगोलशास्त्र व खगोलभौतिकी केंद्र' (IUCAA) ची स्थापना करून ते त्याचे पहिले संचालक झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली IUCAA ही संस्था जागतिक दर्जाचे संशोधन केंद्र म्हणून विकसित झाली.डॉ. नारळीकर यांनी विज्ञानविषयक अनेक पुस्तके, विज्ञानकथा आणि लोकप्रिय लेख लिहून विज्ञानप्रसारात मोठे योगदान दिले. विज्ञान सामान्य माणसाच्या भाषेत समजावून सांगण्याची त्यांची शैली विशेष लोकप्रिय ठरली.त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल भारत सरकारने त्यांना १९६५ मध्ये पद्मभूषण आणि २००४ मध्ये पद्मविभूषण या देशातील प्रतिष्ठित नागरी सन्मानांनी गौरविले. तसेच त्यांना १९७८ मध्ये शांती स्वरूप भटनागर पुरस्कार, बी. एम. बिर्ला पुरस्कार आणि अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले. संशोधन, विज्ञानप्रसार आणि शिक्षण या तिन्ही क्षेत्रांतील त्यांचे योगदान भारतीय विज्ञानविश्वासाठी सदैव प्रेरणादायी राहील.

# ईएसआयएस कार्डधारकांना एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये मिळणार कॅशलेस उपचार

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - कर्मचारी राज्य विमा योजना अंतर्गत समाविष्ट असलेल्या हजारो कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी एक अत्यंत दिलासादायक आणि महत्त्वाची बातमी आहे. नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील नंदी हिल्स येथील 'एसएमबीटी हॉस्पिटल आणि महाराष्ट्र कर्मचारी राज्य विमा सोसायटी यांच्यात एक विशेष सामंजस्य करार (चेण) करण्यात आला आहे. नुकत्याच झालेल्या या करारानुसार, आता सर्व ईएसआयएसकार्डधारक आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबातील सदस्यांना एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये दुय्यम दर्जाचे सर्व वैद्यकीय उपचार आणि निदान चाचण्या पूर्णपणे 'कॅशलेस' म्हणजेच मोफत उपलब्ध करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.



एसएमबीटी हॉस्पिटलसोबतच्या या महत्त्वपूर्ण करारामुळे नाशिक, इगतपुरी, सिन्नर, कोपरगाव, अकोले, संगमनेर, अहिल्यानगरसह ठाणे पालघर परिसरातील औद्योगिक वसाहतीत काम करणाऱ्या हजारो कर्मचारी वर्गाला मोठ्या कॉर्पोरेट दर्जाच्या हॉस्पिटलमध्ये मोफत आणि दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या करारानुसार, एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये इएसआयएस लाभार्थ्यांना विविध विभागांतर्गत उपचार घेता येतील. यात जनरल मेडिसिन, जनरल सर्जरी, स्त्रीरोग व प्रसूती शास्त्र विभाग, बालरोग चिकित्सा, अस्थिरोग निवारण, कान, नाक, घसा आणि दंतचिकित्सा, नेत्ररोग चिकित्सा, आयसीयु, यासोबतच हॉस्पिटलमधील वेगवेगळ्या रेडीऑलॉजी तपासण्या आणि ब्लड बँक यांसारख्या अत्याधुनिक तपासणी सेवाही लाभार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये उपचार मिळवण्यासाठी रुग्णाकडे सक्षम प्राधिकरणाने दिलेले वैध इएसआयएस ओळखपत्र किंवा आधार कार्ड असणे अनिवार्य आहे. रुग्णांना उपचार घेण्यासाठी एमएच-ईएसआय सोसायटीच्या संबंधित वैद्यकीय अधीक्षक, प्रशासकीय वैद्यकीय अधिकारी किंवा प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून अधिकृत रेफरल पत्र आणावे लागेल. या पत्राची वैधता जारी केल्यापासून ७ दिवसांपर्यंत असेल.

**एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये आम्ही केवळ उपचार करत नाही, तर अत्याधुनिक तंत्रज्ञान, जागतिक दर्जाच्या वैद्यकीय सुविधा आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाद्वारे रुग्णांना नवजीवन देण्याचा प्रयत्न करतो. कर्मचारी राज्य विमा योजनेच्या या करारामुळे आता सामान्य कर्मचाऱ्यालाही एकाच छताखाली २५ पेक्षा अधिक स्पेशालिटी आणि सुपर स्पेशालिटी सेवांचा लाभ घेता येईल. आर्थिक अडचणीशिवाय कुठल्याही कर्मचाऱ्याला पूर्णपणे कॅशलेस उपचार उपलब्ध होतील. अत्याधुनिक वैद्यकीय सेवा प्रत्येकाच्या आवाक्यात आणणे, हेच आमचे ध्येय आहे.**

**सचिन बोरसे, संचालक, आरोग्यसेवा**

दरम्यान, जर एखादा रुग्ण अत्यवस्थ परिस्थितीत थेट हॉस्पिटलमध्ये दाखल झाला, तर त्याला उपचारासाठी रेफरल पत्राची वाट पाहावी लागणार नाही. अशा वेळी रुग्णाने स्वतःचे ईएसआयएस कार्ड दाखवून प्रवेश मिळवायचा आहे. त्यानंतर २४ तासांच्या आत संबंधित ईएसआयएस अधिकाऱ्यांकडून त्या रुग्ण प्रवेशाचे नियमन करून घेतले जाईल. ज्यामुळे रुग्णाला कोणताही आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार नाही. याबाबत वैद्यकीय प्रशासन अधिकारी डॉ. अनिता भामरे, प्रशासन कार्यालय अधिकारी डॉ. अंजली नागपूरकर आणि दुय्यम विभाग अधिकारी डॉ. प्राजक्ता जाधव यांनी सांगितले.

# संगमनेरात जिल्हा बँकेसाठी सर्वाधिक ठराव

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर-

जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी संगमनेर तालुक्यात सर्वाधिक ठराव घेण्यात आले आहे. या निवडणुकीत संगमनेरची निर्णयक भूमिका असणार असून एकूण ७३२ ठराव घेतले आहे. दरम्यान, माजीमंत्री बाळासाहेब थोरात, माजी आ. डॉ. सुधीर तांबे. डॉ. जयश्री थोरात, माधवराव कानवडे, गणपतराव सांगळे, साहेबराव नवले यांच्या यांचा नावाचे ठराव घेतल्याची माहिती उपनिबंधक संतोष कोरे यांनी दिली.

ठराव घेण्यासाठी गेल्या काही दिवसांपासून संगमनेर तालुक्यात सहकारी संस्थांमध्ये चांगलीच रस्सीखेच सुरु होती. अखेरच्या क्षणापर्यंत जिल्हा बँकेच्या ठरावासाठी उशिरापर्यंत काथ्याकूट सुरू होता. यात ठराव अपूर्ण, त्रुटी असल्याने ते वगळण्यात येऊन, अंतिम ठराव हे ७३३ झाल्याचे उपनिबंधक कार्यालयाकडून सांगण्यात आले.

सुरुवातीला दुपारी उशिराने ८५२ आकडेवारी आल्याचे कार्यकर्त्यांना सांगितले गेले, मात्र यातील काही ठराव अप्राप्त झाले. काही त्रुटी निघाल्या. तर काही अपात्र ठरले यामुळे ही संख्या घटली. तर विविध सहकारी विकास संस्था १३५, शेतीपूरक ३०८, बिगरशेती -२९०, अशा एकुण ७३३ संस्थांचे ठराव घेण्यात आले आहे. दरम्यान, माजीमंत्री बाळासाहेब थोरात, माजी आ. डॉ. सुधीर तांबे. डॉ. जयश्री थोरात, माधवराव कानवडे, गणपतराव सांगळे, साहेबराव नवले यांच्या नावाचे ठराव घेण्यात आले.

# धरणांमध्ये ४४.६५ टक्केच पाणीसाठा

# गतवर्षीपेक्षा २३३ टीएमसीने घट

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यातील धरणांमध्ये यंदा पाणीसाठ्यात मोठी घट झाली आहे. राज्यातील लहान, मध्यम आणि मोठ्या मिळून ३,०२९ धरणांमध्ये १७ जुलै २०२६ अखेर केवळ ६४३.५८३ टीएमसी म्हणजेच ४४.६५ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. हा साठा गतवर्षीच्या तुलनेत २३३.५१ टीएमसीने कमी झाला आहे.

जलसंपत्ती अभ्यासक आणि जलसिंचन तज्ज्ञ इंजि. हरिश्चंद्र चकोर यांनी दिलेल्या माहितीनुसार, गतवर्षी १७ जुलै २०२५ रोजी राज्यातील धरणांमध्ये ८७७.०९० टीएमसी म्हणजेच ६०.८५ टक्के पाणीसाठा होता. यंदा पावसाने अपेक्षित हजेरी न लावल्यामुळे धरणांमधील पाणीसाठ्यात मोठी घट झाली आहे. मात्र, पावसाळ्याचे अजून अडीच महिने शिल्लक असून, या कालावधीत चांगला पाऊस झाल्यास धरणांतील पाणीसाठा वाढू शकतो.

राज्यातील सहा महसुली विभागांमध्ये कोकण विभागात सर्वाधिक ६२.२५ टक्के पाणीसाठा आहे. तर मराठवाड्यात सर्वात कमी २५.३१ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मराठवाड्यातील पाणीसाठ्यात गतवर्षीच्या तुलनेत मोठी घट झाल्याने चिंता वाढली आहे.राज्यातील प्रमुख धरणांमध्ये कोयना धरणात ४८.७७ टीएमसी (४८.७१ टक्के), उजनी धरणात २८.९६ टीएमसी (५४.०५ टक्के) आणि जायकवाडी धरणात २४.०८६ टीएमसी (३१.४२ टक्के) पाणीसाठा उपलब्ध आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील १३ प्रमुख प्रकल्पांमध्ये सध्या २९.२८३ टीएमसी पाणीसाठा आहे. हा साठा गतवर्षीपेक्षा १५.६६ टीएमसीने म्हणजेच २६.७१ टक्क्यांनी कमी आहे. जिल्ह्यातील भंडारदरा धरणात ६१.७५ टक्के, निळवंडे धरणात ३५.०३ टक्के, मुळा धरणात ४०.६५ टक्के, आढळा धरणात ८४.५३ टक्के, सीना धरणात ३१.१३ टक्के, घोड धरणात ९७.१९ टक्के आणि भोजापूर धरणात ६२.८८ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.यंदा पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहण्याचा अंदाज असल्याने पिण्याच्या पाण्याचे नियोजन करणे आवश्यक असल्याचे इंजि. चकोर यांनी सांगितले. सप्टेंबरअखेरपर्यंत आणि गरज भासल्यास त्यापुढील काळासाठीही पाणी नियोजन करावे लागणार आहे.

दरम्यान, राज्यातील मुळशी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सर्वाधिक २,८०३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. तर अहिल्यानगर जिल्ह्यातील लोणी येथे सर्वात कमी ९२ मिमी पाऊस झाला आहे. धरणांची सध्याची स्थिती पाहता उर्वरित पावसाळ्यात समाधानकारक पावसाची प्रतीक्षा कायम आहे.

# ८४३ ग्रामपंचायतींसाठी निवडणूक रणशिंग फुंकले

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - जिल्ह्यातील ८४३ ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. ग्रामपंचायत निवडणुकीसाठी १५ एप्रिल २०२६ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभेची मतदार यादीच वापरली जाणार आहे. २४ जुलैला प्रारूप व ४ ऑगस्टला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने या संदर्भातील सूचना जिल्हा प्रशासनाला दिल्या आहेत.

अहिल्यानगर ६०, राहता २५, श्रीरामपूर २७, अकोले ५२, जामखेड ४९, शेवगाव ४८, संगमनेर ९४, पारनेर ८८, पाथर्डी ७९, श्रीगोंदा ६२, नेवासा ५९, कर्जत ५५, राहुरी ४४, कोपरगाव २९ अशा या ८४३ ग्रामपंचायती आहेत. जिल्ह्यात जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२६ दरम्यान मुदत संपलेल्या तसेच नव्याने तयार झालेल्या अशा एकूण ८४३ ग्रामपंचायतीच्या निवडणुका प्रलंबित आहेत. मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर झाल्याने लवकरच या ग्रामपंचायतीच्या निवडणूक होतील अशी शक्यता व्यक्त केली जाते.



ग्रामपंचायतसाठी ४ ऑगस्टला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर लगेचच निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे. याच दरम्यान जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचा कार्यक्रमही जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्ह्यात पुन्हा एकदा निवडणुकीचा धुराळा उडणार आहे. जिल्ह्यातील या ८४३ ग्रामपंचायतींवर सध्या प्रशासक नियुक्त आहेत. मात्र या प्रशासकांच्या अधिकारावर मर्यादा आणल्या गेल्या आहेत. गेल्या अडीच-तीन वर्षांपासून ग्रामपंचायतीच्या निवडणुका रखडल्या आहेत. त्यामुळे गाव पुढाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकाही रखडलेल्या आहेत. ग्रामपंचायतसाठी जुलैच्या पहिल्या आठवड्यात प्रभागनिहाय आरक्षण निश्चित करण्यात आले. त्यानंतर आता राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार मतदार यादीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. निवडणुकांसाठी संगणक प्रणालीद्वारे मतदार यादी अद्ययावत केली जाणार आहे. विधानसभा व प्रभागांची माहिती संकलित करून संगणक प्रणालीवर भरली जाईल. ग्रामपंचायत निवडणुकीसाठी १५ एप्रिल २०२६ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभेची मतदार यादी वापरली जाणार आहे. प्रारूप मतदार यादी २४ जुलैला प्रसिद्ध करण्यात येणार आहे. २९ जुलैपर्यंत त्यावर हरकती व सूचना दाखल करता येणार आहेत. ४ ऑगस्टला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल.

पाईल्सचा कायमचा उपाय ! वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी जड्ड डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



SALE 25 TO 50 % OFF
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था...
भंडारी क्लॉथ सेंटर सिल्क अँड सारीज
मनासारखी खरेदी आणि भरपूर फायदा देणारा सेल (संपूर्ण ए.सी. शोरूम)
मेनरोड कॉर्नर, बाजारपेठ, संगमनेर

# संगमनेरमध्ये 'सिलिका कोचिंग इन्स्टिट्यूट फॉर डिझाईन अँड आर्किटेक्चर' शाखेचे उद्‌घाटन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - डिझाईन व आर्किटेक्चर क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत आनंदाची बातमी म्हणजे सिलिका कोचिंग इन्स्टिट्यूट फॉर डिझाईन अँड आर्किटेक्चरच्या संगमनेर शाखेचे उद्‌घाटन नुकतेच मोठ्या उत्साहात पार पडले. या नव्या शाखेचे उद्‌घाटन माजी आमदार डॉ. सुधीरजी तांबे व डॉ. संजयजी मालपाणी यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी सिलिका इन्स्टिटच्यूटच्या संस्थापक रेगे मॅडम, सीईओ चिरंजीत रेगे, आर्किटेक्ट अरविंद वैद्य, डॉ. संज्योत वैद्य, अजित काकडे, सिद्धी वैद्य यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



मुंबईस्थित सिलिका इन्स्टिटच्यूट गेली २१ वर्षे विद्यार्थ्यांना डिझाईन आणि आर्किटेक्चर क्षेत्रातील करिअरसाठी सक्षम मार्गदर्शन करत आहे. आर्किटेक्चर, प्रॉडक्ट डिझाईन, फॅशन डिझाईन, इंटिरिअर डिझाईन अशा विविध क्षेत्रांत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेच्या तयारीपासून योग्य महाविद्यालयाची निवड आणि प्रवेश प्रक्रियेपर्यंत सर्वंकष मार्गदर्शन येथे केले जाते.

NID, NIFT, UCEED, NATA यांसारख्या राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षांमध्ये सिलिका इन्स्टिट्यूटने सातत्याने देशातील सर्वोत्तम निकाल दिले आहेत. या परीक्षांतील भारतातील पहिल्या १०० गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये ८० टक्क्यांहून अधिक विद्यार्थी सिलिका इन्स्टिटच्यूटचे असतात, ही संस्थेच्या गुणवत्तेची साक्ष आहे. सध्या सिलिकाच्या देशभरात ३१ शाखा आहेत त्यापैकी तालुकास्तरावरील पहिलीच शाखा आता संगमनेर येथे सुरू झाली आहे. सूर्या शॉपिंग कॉम्प्लेक्स, दायमा हॉस्पिटलसमोर, ऑरेंज कॉर्नर, संगमनेर येथे सुरू झालेल्या या शाखेमुळे संगमनेर व संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार डिझाईन शिक्षणासाठी पुणे, नाशिक किंवा मुंबई गाठण्याची गरज राहणार नाही.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. संजय मालपाणी म्हणाले की, दरवर्षी देशात सुमारे १५ लाख अभियंते शिक्षण पूर्ण करतात, मात्र केवळ १५ हजार आर्किटेक्ट तयार होतात. बदलत्या जीवनशैलीमुळे प्रत्येक क्षेत्रात डिझायनर्सची मागणी झपाट्याने वाढत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग आले असले तरी कल्पकता, सर्जनशीलता आणि वेगळा दृष्टिकोन असलेल्या व्यक्तीची जागा एआय कधीच घेऊ शकणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पारंपरिक करिअरसोबतच डिझाईन आणि आर्किटेक्चर यांसारख्या नव्या क्षेत्रांकडेही गांभीर्याने पाहिले पाहिजे. माजी आमदार डॉ. सुधीरजी तांबे यांनी संगमनेरमध्ये सिलिकाची शाखा सुरू करण्याच्या उपक्रमाचे कौतुक करत कु. सिद्धी संज्योत अरविंद वैद्य यांना पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

सिलिकाच्या संस्थापक रेगे मॅडम व सीईओ चिरंजीत रेगे यांनीही संगमनेरमध्ये शाखा सुरू झाल्याबद्दल समाधान व्यक्त करत सांगितले की, अहिल्यानगर जिल्ह्यात आजवर सिलिकाची शाखा नव्हती. त्यामुळे डिझाईन क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठ्या शहरांमध्ये जावे लागत होते. आता संगमनेरमध्येच अत्याधुनिक दर्जाचे मार्गदर्शन उपलब्ध झाल्याने विद्यार्थी आणि पालक दोघांनाही मोठा दिलासा मिळणार आहे. या शाखेमुळे ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी डिझाईन आणि आर्किटेक्चर क्षेत्रातील करिअरची दारे अधिक व्यापकपणे खुली होणार असून, संगमनेर परिसरातील अनेकविद्यार्थ्यांची डिझायनर होण्याची स्वप्ने साकार करण्यासाठी ही संस्था महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला

# तालुक्यात ७५ टक्के पेरण्या पूर्ण
## आता शेतकऱ्यांची ओढ पावसाकडे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जून महिनाभर दडी मारलेल्या पावसाने जुलैच्या पहिल्या आठवड्यात काही प्रमाणात हजेरी लावताच संगमनेर तालुक्यात खरीप पेरण्यांना वेग आला. गेल्या दहा ते बारा दिवसांत तालुक्यात सुमारे ७५ टक्के पेरण्या पूर्ण झाल्या असून, आता पिकांच्या उगवणीसाठी शेतकरी समाधानकारक पावसाची आतुरतेने वाट पाहत आहेत.



तालुका कृषी अधिकारी रेजा बोडके यांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ ते ७ जुलैदरम्यान तालुक्यातील अनेक भागांत पेरणीयोग्य पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर खरीप पिकांची लागवड केली. मात्र त्यानंतर पावसाने पुन्हा उघडीप दिल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. १० जुलैपर्यंत तालुक्यात केवळ ३५ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे.

तालुक्यात आतापर्यंत २५,०२४.८ हेक्टर क्षेत्रावर पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. त्यामध्ये सोयाबीन ८,९४७.१ हेक्टर, बाजरी ३,६२५.९ हेक्टर, मका २,३४६ हेक्टर, कापूस १,५९१ हेक्टर, ऊस (जुना व नवा) ७०७ हेक्टर, भुईमूग ४७५ हेक्टर तसेच भाजीपाला पिके ३३२.८ हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे.

काही भागांत अद्यापही पेरण्या सुरू आहेत. मात्र ज्या भागात पुरेसा पाऊस झालेला नाही, तेथे पेरण्या खोळंबल्या असून शेतकरी पावसाची प्रतीक्षा करत आहेत. वेळेत पाऊस न झाल्यास दुबार पेरणीचे संकट ओढवू शकते, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे.

यंदा तालुक्यात सोयाबीन आणि कापसाच्या क्षेत्रात वाढ झाली असून बाजरीचे क्षेत्र घटले आहे. निळवंडे कालव्याचे पाणी उपलब्ध झालेल्या भागांत ऊस लागवडीचे क्षेत्रही हळूहळू वाढत आहे. तसेच पाण्याची उपलब्धता असलेल्या परिसरात शेतकरी वर्षभर भाजीपाला पिकांकडे वळत असून, कमी कालावधीत आर्थिक परतावा देणाऱ्या पिकांना प्राधान्य देत आहेत.तालुका कृषी अधिकारी रेजा बोडके यांनी शेतकऱ्यांना ३१ जुलैपूर्वी पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
कर्ज रक्कम वाढ । कर्ज व्याजदर कमी । कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

# नाशिक -पुणे रेल्वेसाठी लाक्षणिक उपोषण




युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर - नाशिक -पुणे सरळ रेल्वे मार्गात कोणताही बदल न करता या मार्गाचे काम तात्काळ सुरू करावे या मागणीसाठी संगमनेरातील विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी संगमनेर बसस्थानकासमोर १ दिवसाचे लाक्षणिक उपोषण केले. यात दत्ता ढगे यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
अत्याधुनिक लॅमिनार शस्त्रक्रिया ऑपरेशन थिएटर
• मेंदुविकार शस्त्रक्रिया • किडनी शस्त्रक्रिया
• खुबा प्रत्यारोपण • मुत्रविकार शस्त्रक्रिया
• गुडघा प्रत्यारोपण • दुर्बिणीद्वारे पोटाच्या व
• पोटाच्या शस्त्रक्रिया • आतड्याच्या शस्त्रक्रिया
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४०६२ मोबा. ७०३८७०३८२

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

स्वास्थ्य रक्षणाय रोग परिहाराय
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25